

# दोन स्पेशल : क्लासिक अँड स्पेशल

अथर्व थिएटर्स आणि मिश्री थिएटर्स या संस्थांचे 'दोन स्पेशल' हे नाटक रंगभूमीवर चांगलेच गाजत आहे. मूळ ह. मो. मराठे यांच्या कथेवरील या नाटकाचे लेखन, दिग्दर्शन क्षितिज पटवर्धन यांनी केले आहे. पत्रकारिता आणि प्रेम कहानी अशा दुहेरी कथेतून नाटक आकाराला येते. स्वत: ह. मो. मराठे हे ज्येष्ठ पत्रकार आहेत. 'लोकप्रभा' या साप्ताहिकाचे ते संपादक होते. त्याकाळात 'लोकप्रभा' चा विक्रमी सेल वाढविणारे संपादक असा त्यांचा लौकिक होता. असो. पत्रकारितेत मूल्याधिष्ठित पत्रकारिता करणाऱ्या पत्रकारांचा स्वतंत्र असा वर्ग असतो आणि अशी मूल्याधिष्ठित पत्रकारिता करणाऱ्यांना 'फिटर' पत्रकार अथवा मॅनेज होणाऱ्या पत्रकारांकडून नेहमीच त्रास होत असतो इतकेच काय असे सचोटिचे पत्रकार कळपाबाहेर फेकले जातात. अन् त्यांच्या आयुष्याची परवड होते. आजकाल 'स्वेच्छा निवृत्ती' अर्थात 'सक्तीची निवृत्ती' हे अतिशय परवलीचे शब्द आणि अस्त्र पत्रकारितेच्या व्यवसायात रूढ आहे. या निवृत्तीचा 'प्रसाद' अनेकांनी अनुभवला आहे. ह. मो. मराठे यांच्या कथेत पत्रकारितेतील या खाच खळग्यांचे मर्मग्राही दर्शन आहे त्यावर नाटक बेतताना पत्रकारिते सोबत प्रेमकहानी गुंफण्यात आलेल्या या 'दोन स्पेशल' ची गणना अभिजात नाट्यकृतीत करावी लागेल कारण

या नाटकांचे अभिजातपण विविधांगी आहे. विषयाच्या अंगाने, अभिनयाच्या अंगाने, नेपथ्याच्या अंगाने आणि समग्र परिणाम म्हणून नाटक नजरेत भरते ते प्रदीप मुळ्ये  यांच्या नेपथ्याच्या दर्शनाने. वर्तमान पत्राचे मोडकळीस आलेले कर्यालय, तिथल्या खुर्च्या अन् एकूणच वातावरण मोबाईल पूर्व जमान्यातील वर्तमानपत्र कार्यालयाचा अस्सल फिल देते. त्यातल्या त्यात वर्तमानपत्र कार्यालय पुण्यातले. पुण्याच्या अंगवळणी पडलेल्या इमारतीचा आणि व्यक्तीरेखांचा अस्सल 'पुणेरी टच' दोन स्पेशलला आहे.

मिलिंद भागवत (जितेंद्र जोशी) नावाचा पत्रकार. पुण्याच्या 'हिंदुस्थान' दैनिकात रात्र पाळीला असतो. 'रात्रपाळी' हा त्याच्या शिक्षेचाच एक भाग असतो. असे समजायला हरकत नाही. उपसंपादक असलेला भागवत कार्यालयात बातम्यांच्या जंजाळात मग्न अन् वर्तमानपत्राचे मालक संपादक सहकुटुंब सिमल्याला ऑफीस टूर वर. या कार्यालयाला टेकू दिलेला असतो. कारण इमारत मोडकळीस आलेली असते. भागवत कॉमेन्ट करतो लोकशाहीचा चौथा स्तंभ सध्या टेकू म्हणून उपयोगात येत आहे. सचोटीच्या  पत्रकाराच्या अशा काही 'आम्लयुक्त प्रतिक्रिया' सुरू असतात न असतात तोच त्या कार्यालयात स्वप्ना नावाची मिलिंद ची मैत्रीण येते. स्वप्ना याच वर्तमानपत्रात आधी पत्रकार असते.  स्वप्ना (गिरिजा ओक गोडबोले) येण्या आधी सातारचा एक होतकरू तरूण पत्रकार होण्याच्या निर्धाराने मिलिंद भागवतला भेटून जातो अन् चक्क कामालाही लागतो.

शहरात एका सांस्कृतिक केंद्राची इमारत पडलेली असते त्याखाली काही मजूर ठार झालेले असतात. त्यामुळे एका मजूराच्या कुटुंबातली निराधार मुलगी अन् एक तान्हं लेकरू एवढेच बचावलेले असतात. या तान्ह्या लेकराला तिची निराधार बहिण मांडीवर घेवून हताशपणे बसलेली असते. पत्रकार मिलिंद भागवत याला ही घटना काळीज चिरून जाणारी वाटते. भागवत सांस्कृतिक केंदाची स्टोरी पहिल्या पानावर तीन कॉलम छापू लागतो. तेवढ्यात स्वप्ना तिथे आलेली असते. त्या सांस्कृतिक केंदाचे बांधकाम स्वप्ना जिथे जनसंपर्क अधिकारी म्हणून काम करते त्या कंपनीने केलेले असते. बातमीत त्या कंपनीचे नाव येवू नये यासाठी स्वप्ना मिलिंदला आर्जव करते. स्वप्ना व मिलिंद दोघेही पत्रकार होते दोघांचे एकमेकांवर प्रेम होते. पण विचित्र परिस्थितीत दोघे एकमेकांपासून दूर गेलेले असतात. अन् सांस्कृतिक केंदाच्या बातमीच्या निमित्ताने दोघे एकत्र येतात. मिलिंद पत्रकारितेला विटलेला असतो. अन् राजीनाम्याच्या तयारीत असतो. त्याने राजीनामा देऊ नये अशी विनवणी स्वप्ना करते. विषय परत परत फिरून सांस्कृतिक केंद्राच्या बातमीशी येतो. कुठल्याही परिस्थितीत बातमी छापणार अन् त्यात त्या कंपनीचे नावही छापणार असा मिलिंदचा निर्धार असतो. स्वप्ना रडवेली होते कारण बातमी छापून आली अन् त्यात कंपनीचे नाव आले तर तिची नोकरी जाणार असते. शेवटी मिलिंदला तडजोड करावी लागणार नाही अशी एक घटना घडते. एका मोठ्या विमान अपघाताची बातमी थडकते. त्यामुळे सांस्कृतिक केंदाची इमारत कोसळल्याची स्थानिक बातमी अर्थातच छोटी होते. झाले ! स्वप्ना प्रेमभराने मिलिंदला मिठी मारते व वर्तमानपत्राच्या कार्यालयातून काढता पाय घेते संमिश्र भावनांच्या कल्लोळात 'वाचलेली नोकरी अन् विसरावा लागणारा मित्र, प्रियकर' !

या नाटकाबद्दल लेखक दिग्दर्शक क्षितिज पटवर्धन यांनी मांडलेली भूमिका अशी.. " 'दोन स्पेशल' मध्ये केवळ पत्रकारितेची ढासळलेली मूल्ये नाहीत तर यात एक प्रेमकथा असून या प्रेमकथेला वेदनेची झालर आहे. नाटकातील मुख्य व्यक्तिरेखा ही प्रामाणिक, पत्रकारितेची मूल्ये पाळणारी असून पुढे ती परिस्थितीला शरण गेलेली आहे. सर्वसामान्यांच्या आयुष्यातही असे कधी ना कधी घडते. त्याला तडजोड करावी लागते. त्याची वेदना ही सर्वसामान्य माणसाचे प्रतिनिधित्व करते. हे सर्व नाट्य प्रभावीपणे नाटकातून मांडण्याचा प्रयत्न करतानाच हा संघर्ष आणि द्वंद उठावदार कसे होईल याकडेही लक्ष दिले आहे. कथेवरून नाटक करताना काही प्रमाणात मी स्वातंत्र्य घेतले आहे." गुजराती, हिंदी नाटकात काम केलेल्या आणि आता मराठीकडे वळलेल्या गिरीजा ओक गोडबोले यांना 'दोन स्पेशल' नाटक जबरदस्त वाटतंय नुसतं अभिवाचन केलं तरी हे नाटक लोकांना आवडेल असा त्यांना विश्वास आहे. हे नाटक म्हणजे आमच्या तरूण पिढीने काहीतरी नवं देण्याचा प्रयत्न केला आहे. अशी भूमिका जितेंद्र जोशी यांची आहे.

नव्वदीच्या दशकातल्या नाटकाचे गुण आणि मर्यादा 'दोन स्पेशल' या नाटकालाही आहेत. नाटक कळत-नकळत कानेटकरी कालेलकरी वाटतंय पण त्यामुळेच तो काळ समर्थपणे दिग्दर्शक उभा करू शकला असं म्हणायलाही हरकत नाही.

पत्रकारितेत मूल्यांचे रक्षण करताना एका पत्रकाराची कशी घुसमट होते. त्याचं दर्शन 'दोन स्पेशल' मध्ये घडतं. मूळ ह. मो. मराठे यांच्या कथेत दोन पुरूष मित्र आहेत. दोन पुरूष पात्रांऐवजी एक पुरूष एक स्त्री असली तरी नाटकातील संघर्ष अधिक तीव्र होईल अशी लेखक, दिग्दर्शक क्षितिज पटवर्धन यांची धारणा अथवा होरा. हा होरा खरा ठरला. मिलिंद भागवत-स्वप्नाच्या प्रेम कहानीचं रसायन या नाटकात अधिक परिणामकारक ठरलं. साधारणत: १९९०-१९९५ च्या काळातलं पत्रकारितेचं विश्व उभं करण्यात क्षितिज पटवर्धन आणि प्रदीप मुळ्ये यशस्वी ठरले आहेत.

गिरिजा ओक गोडबोले, जितेंद्र जोशी यांनी साकार केलेल्या स्वप्ना, मिलिंद भागवत या भूमिका खरोखरच सुरेख आहेत.

'दोन स्पेशल' हे नाटक आशय आणि अभिव्यक्ती या दोन्ही हिंदोळ्यांवरचे एक अभिजात नाटक आहे. क्लासिक आणि स्पेशल असे त्याचे वर्णन करता येईल. निर्माते संतोष भरत काणेकर आणि जितेंद्र जोशी यांना धन्यवाद !

**प्रा. डॉ. प्रकाश खांडगे**

**३०१, ३०२, पुनर्वसू, कोरस नक्षत्र, पोखरण रोड १,**
**वर्तक नगर, ठाणे (प) - ४०० ६०६**
**०२२-२५८८२२२३, भ्रमणध्वनी - ९८२१९१३६००**